# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे- ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (क्र.) : ०२०-६९०६७९१८, ६९०६७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

झो. पु. प्रा
निश्चयेन परिवर्तनम्।
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.झोपुप्रा/जनसंपर्क/३/४१२१-४/२०२६ दि.१५ सप्टेबर, २०२६

## सोशल मीडिया हँडलिंग व डिजिटल कम्युनिकेशन सेवा देण्यासाठी अनुभवी संस्थेची नियुक्तीसाठी दरपत्रक मागविण्याची सूचना

सोशल मीडिया हँडलिंग व डिजिटल कम्युनिकेशन सेवा देण्यासाठी अनुभवी संस्थेची नियुक्ती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड, पुणे यांच्या अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे प्रभावी व्यवस्थापन, नागरिकांपर्यंत माहितीचा प्रसार, विविध शासकीय/संस्थात्मक उपक्रमांचे डिजिटल माध्यमातून प्रभावी सादरीकरण, क्रिएटिव्ह कंटेंट निर्मिती, फोटो/व्हिडिओ निर्मिती व संपादन, पोस्ट डिझाईन, सोशल मीडिया मॉनिटरिंग इत्यादी कामांसाठी अनुभवी व पात्र संस्थेची नियुक्ती करण्यासाठी इत्यादी कामांसाठी अनुभवी व पात्र संस्थेची नियुक्ती करण्याकरिता दि१७.०८.२०२६ ते दि२५.०८.२०२६ या कालावधीत कार्यालयाच्या संकेत स्थळावर जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार सदर जाहिरातीनुसार दोनच संस्थांकडून दरपत्रक प्राप्त झाले आहेत, निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे तीन पेक्षा कमी निवेदिकारांनी भाग घेतला असल्याने संस्था नियुक्त करण्यासाठी एक आठवड्याची मुदतवाढ देण्यात येत आहेत.

यासाठी पात्र व अनुभवी संस्था/एजन्सीकडून दरपत्रक (Financial Quotation) तसेच तांत्रिक प्रस्ताव (Technical Proposal) मागविण्यात येत आहेत.

### १. कामाचा व्याप्ती

**निवड झालेल्या संस्थेस खालीलप्रमाणे कामे करावी लागतील**

१. संस्थेच्या अधिकृत Facebook, Instagram, X (Twitter), YouTube इत्यादी सोशल मीडिया खात्यांचे व्यवस्थापन.
२. दरमहा नियोजित सोशल मीडिया कंटेंट कॅलेंडर तयार करणे.
३. मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेत आवश्यकतेनुसार मजकूर तयार करणे.
४. आकर्षक पोस्ट, बॅनर, इन्फोग्राफिक्स व क्रिएटिव्ह तयार करणे.
५. फोटो व व्हिडिओ शूटिंग, व्हिडिओ एडिटिंग व आवश्यकतेनुसार Reels/Shorts तयार करणे.
६. संस्थेच्या योजना, उपक्रम, कार्यक्रम, सूचना व उपलब्धी यांचा सोशल मीडिया प्रचार.
७. विशेष मोहिमा व जनजागृती मोहिमांसाठी डिजिटल कंटेंट तयार करणे.

८. सोशल मीडिया कमेंट्स/मेसेजेसचे मॉनिटरिंग व आवश्यक अहवाल सादर करणे.
९. सोशल मीडिया Analytics व Performance Report दरमहा सादर करणे.
१०. आवश्यकतेनुसार कार्यक्रमस्थळी फोटो/व्हिडिओ कव्हरेज करणे.
११. सोशल मीडिया ट्रेंडनुसार योग्य व संस्थेच्या प्रतिमेला अनुरूप कंटेंट सुचविणे.
१२. संस्थेच्या सूचनेनुसार इतर संबंधित डिजिटल कम्युनिकेशनची कामे करणे.

## २. संस्थेची किमान पात्रता

दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेने खालील अटी पूर्ण करणे आवश्यक राहील–

१. संस्था/एजन्सी संबंधित कायद्यानुसार नोंदणीकृत असावी.
२. सोशल मीडिया व्यवस्थापन/डिजिटल मार्केटिंग/कम्युनिकेशन क्षेत्रातील किमान तीन वर्षांचा अनुभव असावा.
३. मागील तीन वर्षांत किमान तीन शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था किंवा नामांकित संस्थांसाठी तत्सम काम केलेले असावे.
४. तत्सम कामाच्या किमान तीन Work Orders/Work Completion Certificates सादर करणे आवश्यक राहील.
५. संस्थेकडे प्रशिक्षित व अनुभवी Content Writer, Graphic Designer, Video Editor आणि Social Media Manager उपलब्ध असावेत.
६. संस्थेची मागील कामगिरी समाधानकारक असावी.
७. संस्थेने PAN, GST व इतर लागू नोंदणी प्रमाणपत्रे सादर करावीत.
८. संस्था कोणत्याही शासकीय/निमशासकीय संस्थेकडून काळ्या यादीत (Blacklisted) टाकलेली नसावी.
९. मागील आर्थिक वर्षातील उलाढालीचा आवश्यक पुरावा सादर करावा.
१०. आवश्यकतेनुसार कार्यालयीन/कार्यक्रमस्थळी प्रत्यक्ष सेवा देण्याची क्षमता असावी.

## ३. सादर करावयाची कागदपत्रे

१. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
२. PAN कार्ड
३. GST प्रमाणपत्र
४. मागील ३ वर्षांचा अनुभवाचा तपशील
५. Work Orders/Work Completion Certificates
६. मागील तीन वर्षांची आर्थिक उलाढाल प्रमाणपत्र / CA चे प्रमाणपत्र
७. मनुष्यबळाची माहिती
८. यापूर्वी केलेल्या तत्सम कामांचा Portfolio
९. Blacklisting नसल्याबाबतचे घोषणापत्र
१०. तांत्रिक प्रस्ताव
११. आर्थिक दरपत्रक

## ४. निवड प्रक्रिया

संस्थेची निवड Quality-cum-Cost Based Selection (QCBS) किंवा कार्यालयाने निश्चित केलेल्या नियमानुसार केली जाईल.

## ५. तांत्रिक मूल्यमापन निकष

| अ.क्र. | निकष | कमाल गुण |
|---|---|---|
| १ | संबंधित क्षेत्रातील अनुभव | २० |
| २ | शासकीय/निमशासकीय संस्थांसाठी केलेले तत्सम काम | २० |
| ३ | संस्थेचे Portfolio व कामाची गुणवत्ता | १५ |
| ४ | उपलब्ध तज्ज्ञ मनुष्यबळ | १५ |
| ५ | तांत्रिक प्रस्ताव व कार्यपद्धती (Methodology) | १५ |
| ६ | सादरीकरण/Presentation व प्रस्तावाची गुणवत्ता | १५ |
| | एकूण | १०० |

तांत्रिक मूल्यमापनामध्ये किमान ७० गुण प्राप्त करणाऱ्या संस्थांच्याच आर्थिक दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

## ६. आर्थिक दरपत्रक

संस्थेने खालील बाबींचे दर स्वतंत्रपणे सादर करावेत–

| अ.क्र. | सेवेचा प्रकार | वार्षिक दर ₹ |
|---|---|---|
| १ | सोशल मीडिया अकाउंट व्यवस्थापन | |
| २ | Content Writing | |
| ३ | Graphic Design/Creative Posts | |
| ४ | Video/Reels निर्मिती व Editing | |
| ५ | Photo/Video शूटिंग | |
| ६ | Social Media Campaign Management | |
| ७ | Analytics/Monthly Report | |
| ८ | कार्यक्रमाचे Live/On-site Coverage | |
| ९ | इतर संबंधित सेवा | |
| | एकूण | |

टीप: लागू असलेले GST व इतर कर स्वतंत्रपणे नमूद करावेत.

६. Technical Evaluation Sheet

खाली सोशल मीडिया हँडलिंगसाठी संस्थेची निवड करण्याकरिता १०० गुणांचे सविस्तर Technical Evaluation Sheet नुसार गुण देण्यात येतील.

Technical Evaluation Sheet (एकूण १०० गुण)

| अ.क्र. | मूल्यमापनाचा निकष | गुणांचे विभाजन | कमाल गुण |
|---|---|---|---|
| १ | संबंधित क्षेत्रातील अनुभव | ३ वर्षे = ५,<br>३ ते ५ वर्षे = १०,<br>५ ते ७ वर्षे = १५,<br>७ वर्षांपेक्षा जास्त = २० | २० |
| २ | शासकीय/निमशासकीय संस्थांसाठी केलेले तत्सम काम | प्रत्येक पात्र संस्थेसाठी ३ गुण | १५ |
| ३ | संस्थेचे Portfolio व कामाची गुणवत्ता | Content & Graphic Design = ५,<br>Video/Reels & Campaign = ५,<br>Overall creativity = ५ | १५ |
| ४ | उपलब्ध तज्ज्ञ मनुष्यबळ | Social Media Manager = ५,<br>Content Writer & Graphic Designer = ५,<br>Video Editor/Photographer /Videographer = ५,<br>इतर तांत्रिक मनुष्यबळ & Team experience = ५ | २० |
| ५ | तांत्रिक प्रस्ताव व कार्यपद्धती (Methodology) | Content Strategy = ३,<br>Content Calendar = २,<br>Approval System = २,<br>Crisis Management = २,<br>Analytics/Reporting = ३,<br>Innovation/Trend Strategy = ३ | १५ |
| ६ | सादरीकरण/Presentation व प्रस्तावाची गुणवत्ता | विषयाची समज = ५,<br>प्रत्यक्ष नमुना सादरीकरण = ५,<br>प्रश्नांना उत्तरे व सादरीकरणाची गुणवत्ता = ५ | १५ |
| | | एकूण गुण | १०० |

गुणांकनाची पद्धत

अ) **संबंधित क्षेत्रातील अनुभव (२० गुण)** : संस्थेचा सोशल मीडिया/डिजिटल कम्युनिकेशन क्षेत्रातील अनुभव तपासावा. अनुभवासाठी Work Order, Agreement किंवा Work Completion Certificate यापैकी ग्राह्य पुरावा सादर करावा.

आ) **शासकीय संस्थांचा अनुभव (१५ गुण)** : महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, शासकीय विभाग, महामंडळ, प्राधिकरण किंवा इतर सार्वजनिक संस्थांसाठी केलेल्या तत्सम कामास प्राधान्य देण्यात येईल.

इ) **Portfolio (१५ गुण)** : संस्थेने यापूर्वी तयार केलेल्या पोस्ट, Infographics, Reels, Short Videos, Campaigns इत्यादींची गुणवत्ता तपासण्यात येईल.

ई) **मनुष्यबळ (२० गुण)** : प्रत्येक प्रमुख कर्मचाऱ्याचे नाव, शैक्षणिक पात्रता, अनुभव व संस्थेशी असलेले संबंध याचा तपशील देण्यात यावा.

उ) **Methodology (१५ गुण)** : निवड होणाऱ्या संस्थेने आपल्या प्रस्तावामध्ये कार्यालयासाठी सोशल मीडिया कसा हाताळणार आहे, याची स्पष्ट कार्यपद्धती द्यावी.

ऊ) **Presentation (१५ गुण)**: समितीसमोर संस्थेला १५ ते २० मिनिटांचे सादरीकरण देण्यास सांगता येईल. शक्य असल्यास कार्यालयाच्या विषयाशी संबंधित एक नमुना Creative Post आणि एक नमुना Short Video/Reel Concept सादर करावे.

## ७. दरपत्रक सादर करण्याच्या अटी

१. दरपत्रक दिनांक २४/०९/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत सादर करावे.
२. तांत्रिक प्रस्ताव व आर्थिक दरपत्रक स्वतंत्र पाकिटात/लिफाफ्यात सादर करावे.
३. उशिरा प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
४. अपूर्ण कागदपत्रे असलेले प्रस्ताव अपात्र ठरविण्यात येतील.
५. कार्यालयास कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार राहील.
६. संस्थेच्या निवडीसाठी गुणवत्ता व खर्च आधारित निवड (QCBS) पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. तांत्रिक निविदेला ७०% आणि आर्थिक निविदेला ३०% गुण देण्यात येईल.
७. तांत्रिक मूल्यांकनासाठी संस्थेस एकूण १०० गुणांपैकी गुण देण्यात येतील. एकूण किमान ७० गुण (७०%) प्राप्त करणारे निविदादार तांत्रिकदृष्ट्या पात्र मानले जातील.
८. अंतिम तांत्रिक गुण (FTS) = निविदादारास प्राप्त तांत्रिक गुण X (७०/१००)
९. तांत्रिकदृष्ट्या पात्र संस्थांपैकी सर्वात कमी आर्थिक दर (Lowest Commercial Quote) देणाऱ्या निविदादारास आर्थिक मूल्यांकनामध्ये १०० गुण देण्यात येतील आणि त्याच्या आर्थिक गुणांना ३०% भार दिला जाईल.
१०. अंतिम आर्थिक गुण (FCS) = ((सर्वात कमी आर्थिक दर / संबंधित निविदादाराचा आर्थिक दर) X १००) X (३०/१००)

११.तांत्रिक व आर्थिक गुणांचे ७०:३० या प्रमाणात एकत्रित मूल्यांकन करण्यात येईल.
१२.एकूण गुण (Combined Technical & Financial Score) = FTS + FCS
१३.वरील मूल्यांकनानुसार १०० पैकी सर्वाधिक एकूण गुण प्राप्त करणाऱ्या संस्थेचे दरपत्रक सर्वोत्तम मूल्यांकित दरपत्रक (Best Evaluated Quatation) म्हणून ग्राह्य धरली जाईल.
१४.दोन किंवा अधिक संस्थेंचे समान सर्वाधिक एकूण गुण मिळाल्यास, अधिक तांत्रिक गुण प्राप्त करणाऱ्या संस्थेस वाटाघाटीसाठी प्रथम आमंत्रित केले जाईल.
१५.प्राधिकरण सर्वोत्तम मूल्यांकित निविदा किंवा कोणतीही दरपत्रक स्वीकारण्यास बांधील राहणार नाही. कोणतीही दरपत्रक पूर्णतः किंवा अंशतः स्वीकारण्याचा अधिकार प्राधिकरणकडे राहील.
१६.निवड झालेल्या संस्थेसोबत करार करण्यात येईल.
१७.कराराचा कालावधी १ वर्ष राहील व काम समाधानकारक असल्यास नियमानुसार मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.
१८. अंतिम निवड ही केवळ कमी दरावर न करता तांत्रिक गुणवत्ता, अनुभव, क्षमता व आर्थिक दर यांचा एकत्रित विचार करून करण्यात येईल.
१९.संस्थेने सादर केलेल्या माहितीची आवश्यकतेनुसार पडताळणी करण्यात येईल.
२०.अनुभव, Work Orders आणि Portfolio याबाबत खोटी/अपूर्ण माहिती आढळल्यास प्रस्ताव अपात्र ठरविण्याचा अधिकार प्राधिकरण राखून ठेवीत आहे.
२१.कामाची गुणवत्ता समाधानकारक नसल्यास करारातील अटींनुसार कारवाई करण्यात येईल.

दिनांक : १५/०९/२०२६
ठिकाण : पुणे

सतीशकुमार खडके (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे